पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ६

दिनांक - ७/०९/२०१६ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०७/०९/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
२. मा.सुनिता (माई) पांडूरंग गवळी
३. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
४. मा.आहेर संजय निवृत्ती- स्विकृत सदस्य
५. मा.सोमवंशी प्रकाश बबनराव - स्विकृत सदस्य
६. मा. विजय सुदाम रसाळ

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.चंद्रकांत इंदलकर- क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.जीवन गायकवाड, कार्य अभियंता (स्थापत्य), मा.श्री.थोरात– कार्य अभियंता, (विद्युत)), मा.श्री.जयंत बरशेट्टी कार्य. अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.संजय घुबे - उप अभियंता, मा.श्री.वाघमारे एस.बी.-उप-अभियंता (स्थापत्य), मा.श्री.लांडे बी.पी -उपअभियंता (विद्युत), मा.श्री.मनोज सेठीया-उपअभियंता(जनि),मा.श्री.व्ही.सी.काळे-उपअभियंता(स्थापत्य),मा.श्री.जाधव व्ही.के. उपअभियंता (स्थापत्य उद्यान). मा.श्री.व्ही.बी.माने (उपअभियंता नगररचना) मा.श्रीमती शिनकर प्रेरणा (उपअभियंता नगररचना) मा.श्री.निखील फेंडर क.अभियंता (स्थापत्य उद्यान), मा. श्री.इप्पकायल एस. एच.लेखाधिकारी, मा.श्री.दाते टी.एच. - सहा. आरोग्य अधिकारी, मा.श्री.एस व्ही बगाडे-(सहा.उद्याननिरीक्षक), मा.श्री.देशमाने पी.एस.-कार्या.अधिक्षक, मा.श्री.माळी एस.के. आरोग्य निरीक्षक, पशुवैद्यकिय, मा.श्री.नाडेकर बी.के.सहा. शिक्षक, मा.श्रीम. पवळे जयश्री रविंद्र- समुह संघटक नाावियो हे अधिकारी/कर्मचारी सभेस उपस्थित होते.

-----

सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने उपस्थित सन्मा.सदस्य यांनी बुधवार दिनांक ५/१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वा.पर्यंत सभा तहकूब केली.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय,
भोसरी – ३९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र.इक्षेका/०४/कावि /६९४/ २०१६
दिनांक - २९ / ०९/२०१६.
प्रत - कार्यालयीन नोटीस बोर्ड

# नोटीस

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दिनांक ७/९/२०१६ रोजीची दुपारी ३.०० ची मा.इ प्रभाग समितीची सभा (कार्यपत्रिका क्रमांक - ६) बुधवार दिनांक ५/१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वा.पर्यंत तहकूब करणेत येत आहे. तरी सन्मा.सदस्यांनी यांची नोंद घेवून महानगरपालिकेची इ प्रभाग कार्यालयाचे संत ज्ञानेश्वर सभागृहामध्ये ठरलेल्या दिवशी व वेळी **(५/०१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वा**) उपस्थित रहावे ही विनंती.

----

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी - ३९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र.इक्षेका/०४/कावि /६९४/ २०१६
दिनांक - २९/९/२०१६.

प्रत –
कार्यालयीन नोटीस बोर्ड

# नोटीस

पिंपरी चिंचवड महानगरपालिका इ क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समिती मासिक सभा क्र. ६ दिनांक ७/९/२०१६ रोजीची दुपारी ३.०० व प्रभाग समिती मासिक सभा क्र. ७ दिनांक ५/१०/२०१६ रोजीची दुपारी ३.०० या तहकूब झालेल्या सभा शुक्रवार दिनांक १४/१०/२०१६ रोजीची सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आली आहे.

तरी सन्मा.सदस्यांनी इ प्रभाग कार्यालयाचे संत ज्ञानेश्वर सभागृहामध्ये ठरलेल्या दिवशी व वेळी शुक्रवार दिनांक **१४/१०/२०१६ रोजी स. ११.००वा.)** उपस्थित रहावे ही विनंती.

----

सही/-
प्रशासन अधिकारी तथा(सचिव)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र.इक्षेका/०४/कावि /७३६/ २०१६
दिनांक - ६/१०/२०१६.

प्रत –
कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ६
सभावृत्तांत

दि.- ५/१०/२०१६ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची दिनांक ७/९/२०१६ रोजीची तहकूब सभा व बुधवार दि. ५/१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वा.ची मासिक सभा इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

**१. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – अध्यक्ष**
२. मा.मंदाताई उत्तम आल्हाट
३. मा.सुनिता (माई) पांडूरंग गवळी
४ मा.आशा रविंद्र सुपे
५. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६. मा.संजय निवृत्ती आहेर – स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.क्षेत्रीय अधिकारी- चंद्रकांत इंदलकर, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जयंत बरशेट्टी, कार्यकारी अभियंता (पापु), मा.कैलास थोरात- (कार्यकारी अभियंता विद्युत,) मा.जीवन गायकवाड (कार्यकारी अभियंता स्थापत्य), मा.श्री.वाघमारे एस.बी.- उपअभियंता, मा.श्री.व्ही.सी.काळे – उपअभियंता, मा.ए.बी.कोंडे उपअभियंता (पापु), मा.श्री.लांडे बी.पी. उपअभियंता (विद्युत), मा.राऊत व्ही.एस (पापू), मा.श्री.जाधव व्ही.के. उपअभियंता (स्थापत्य उद्यान), मा.एस.बी.शितोळे - क.अभियंता(जलनि:सारण), मा.संदीप ठोकळे- क.अभियंता, मा.श्री.धडस ए.आर.- क.अभियंता, मा.श्री.फेंडर निखील क.अभियंता (स्थापत्य/उद्यान), मा.श्री.सी.एन.खैरे - स.उद्यान निरीक्षक,एस.डी.रावते- मा. श्री. इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.प्रभाकर तावरे- मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.नाडेकर बी.के. स.शिक्षक, श्री.डामसे आर.पी.-मलेरिया निरीक्षक, श्री.देशमाने पी.एस. कार्यालयीन अधिक्षक, श्रीमती जयश्री पवळे.समुहसंघटक,(नावियो विभाग)

-----

त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-

-----

१ सुचक- मा. संजय निवृत्ती आहेर – अनुमोदक- मा.विश्वनाथ विठोबा लांडे

मा.सभापती इ क्षेत्रीय कार्यालय, डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे या आज सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांची निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

-----

**(मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)**

------

**मा.अध्यक्ष -** उरी येथील शहिद जवान यांना श्रध्दांजली व पाकिस्तानचा भ्याड हल्ल्याचा निषेध तसेच भाजपा शहराध्यक्ष मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचे वडील पांडूरंग खंडूजी जगताप यांचे निधन झालेने इ प्रभाग समितीच्या वतीने भावपूर्वक श्रध्दांजली अर्पण करण्यात येत आहे. तसेच आजच्या सभेत दाखल झालेले ऐनवेळचे वि षय दाखल करुन गणसंख्याअभावी सदरची इ प्रभाग समितीची सभा क्रमांक ६ व ७ या शुक्रवार दिनांक १४/१०/२०१६ रोजी स. ११.०० वा.पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

-------

(सर्वांनी दोन मिनीटे श्रध्दांजली अर्पण केली)

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
अध्यक्ष
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक – ६
सभावृत्तांत
(दि.७/९/२०१६ व ५/१०/२०१६ रोजीची तहकुब सभा)

दि.- १४/१०/२०१६ वेळ दुपारी ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची बुधवार दिनांक ७/९/२०१६ व दि.५/१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता ची तहकुब सभा शुक्रवार दिनांक १४/१०/२०१६ रोजी दुपारी ११.०० वा इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.गव्हाणे सुरेखा शंकर **– अध्यक्षा**
२. मा.आल्हाट मंदा उत्तम
३. मा.धनंजय मुरलीधर आल्हाट
४. मा.काळजे नितीन प्रताप
५. मा.वाबळे संजय मल्हारराव
६. मा.मडिगेरी वर्षा विलास
७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
८. मा.सुपे आशा रविंद्र
९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
१०. मा.गोफणे अनुराधा देविदास
११. मा.जालिंदर (बाप्पू) शिंदे
१२. मा.लोंढे शुभांगी संतोष
१३. मा.रसाळ विजय सुदाम - स्विकृत सदस्य
१४. मा.सोमवंशी प्रकाश ब. - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.चंद्रकांत इंदलकर – क्षेत्रीय अधिकारी, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जीवन गायकवाड - कार्यकारी अभियंता (स्थापत्य) मा.कैलास थोरात- कार्यकारी अभियंता, मा.श्री.संजय घुबे –उपअभियंता (स्थापत्य) मा.श्री.सतीश वाघमारे –उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.लांडे बी.पी.उपअभियंता (विद्युत), मा.श्री.व्ही.सी.काळे - उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.मनोज सेठीया-उपअभियंता (ज.नि), मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.टी. एच. दाते – सहा.आरोग्य अधिकारी, मा.भानुदास किसन तापकीर - उद्यान अधिक्षक, मा.श्री.जी.एस.खैरे – स.उद्यान अधिक्षक, मा.श्री.माळी एस.के. – आरोग्य निरीक्षक (पशुवैद्यकिय) मा.श्री.नाडेकर बी.के. सहा.शिक्षक भोसरी, श्री.शिराळ एस.डब्ल्यू – मुख्याध्यापक लांडेवाडी, श्री.देशमाने पी.एस. – कार्यालयीन अधिक्षक.

त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-

-----

१ सुचक- मा.शुभांगी लोंढे अनुमोदक- मा.सुनिता (माई) गवळी

मा.सभापती इ क्षेत्रीय कार्यालय, डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे या आज सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सुरेखा शंकर गव्हाणे यांची निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

-----

**(मा. सुरेखा शंकर गव्हाणे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)**

------

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

अ) दिनांक ३/०८/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक- १

दिनांक- - **१४/१०/२०१६**

सूचक- मा.नितीन काळजे अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ – प्रशासन विभागाकडील पत्र क्र. इक्षेका/१/कावि/९७६/२०१६,

दिनांक ३०/०९/२०१६ चे पत्र.

नगररचना व विकास विभाग यांचे कडील क्र.नरवि/कावि/१६/१६०/ २०१६ दि.२९/०७/२०१६ चे पत्र, मौजे चौविसावाडी व आळंदी हद्दी वरील आळंदी क्षेत्रातील "संत ज्ञानेश्वर महाराज पादुका मंदीर हे पिंचिंमनपा पुणे-आळंदी ६०.००मी रस्त्याच्या आखणीच्या कक्षेत येत आहे. सद्यस्थितीत मौजे चौविसावाडी येथील पुणे-आळंदी ६०.०० मी रस्त्याचे भुसंपादनाचे काम विषेश भुसंपादन अधिकारी घटक क्र. १ यांचे मार्फत करणेत आले असुन भुसंपादनाचा निवाडा जाहिर करणेत आला आहे. सदर भूसंपादन निवाडयानुसार प्रत्यक्षात रस्ताविकासाच्या कामास सुरवात करणेत आली आहे. सदर रस्ता तिर्थ क्षेत्रविकास आराखडया मधील असल्यामुळे मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे मार्फत रस्त्याचे कामाचे प्रगतीबाबत आढावा घेणेत येत असुन सदर तिर्थ क्षेत्र आराखडयातील रस्ते तातडीने वेळेत विकसित करणाच्या सुचना वारंवार देणेत येत आहेत. सदरचे मौजे चौविसावाडी येथील पुणे –आळंदी ६०.०० मी. रस्त्याचे भुसंपादन भागश: मंजूर विकास आराखडयानुसार करणेत आले असून पिंपरी चिंचवड हद्दीबाहेरील आळंदी हद्दीतील संत ज्ञानेश्वर महाराज पादुका मंदीर सदर पुणे-आळंदी ६०.०० मी

रस्त्याच्या आखणी च्या कक्षेत येत असलयामुळे भूसंपादन अधिकारी यांचे मार्फत जाहीर निवाडयातील रस्त्याची आखणी कायम करणेत आली असून आळंदी नगर परिषद हद्दीतील आळंदीविकास आराखडयातील प्रस्तावित ४५.०० मी रस्ता तसेच ईपी नुसार ६०.०० मी रस्ता पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मंजूरविकास आराखडयातील ६०.०० मी रस्त्याला जूळवून घेऊन आखणी प्रस्तावित करणेत आली आहे. सदर सुधारीत प्रस्तावित आखणी नकाशानुसार स.नं. १०९ पैकी मध्ये रस्त्याचे पश्चिमेकडील बाजूची वळणामुळे वाढलेली मंजूर विकास योजना व जाहीर भूसंपादन निवाडया व्यतीरीक्त रस्त्याची जागा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस ताब्यात घ्यावी लागणार आहे. त्यामुळे सदर जागा प्रथम ताब्यात घेणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०५ अन्वये (म्युनिसिपल रोड) रस्ता घोषीत करणे आवश्यक आहे. तरी सदर मान्य आखणी प्रस्तावानुसार सोबतचे मौजे चौविसावाडी येथील स.नं.१०९ मिळकती मधील महाराष्ट्र मनपा अधिनियमचे कलम २०५ अंतर्गत रस्ता घोषित करणे बाबतचा विषय दप्तरी दाखल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

-------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक- २

दिनांक- - **१४/१०/**२०१६

सूचक- मा. सुनिता (माई) पांडूरंग गवळी अनुमोदक – मा.सुरेखा गव्हाणे

संदर्भ – मा. सुनिता (माई) पांडूरंग गवळी यांचे दि.३१/०८/२०१६ चे पत्र,

मा. सुनिता (माई) पांडूरंग गवळी यांचे दि.३१/०८/२०१६ चे पत्र, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भोसरी येथील भोसरी बस टर्मिनलला कै.ह.भ.प.ज्ञानेश्वर लोंढे (भोसरीकर माऊली )असे नामकरण करणेबाबतचा ठराव झालेला आहे भोसरी येथील प्रभाग क्र.३४ गव्हाणे वस्ती स्कायवॉक ब्रिजला कै.ह.भ.प.वै.गुरुवर्य भोसरीकर माऊली तथा ज्ञानोबा भिमाजी लोंढे पादचारी पुल असे नाव दिलेले आहे. **तरी भोसरी बस टर्मिनलला दिलेले नाव बदलून स्वर्गवासी ज्ञानेश्वर (माऊली दादा) सोपान गवळी यांचे नाव देणेस** मान्यता देणेत येत आहे. सदर ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**मा.अध्यक्षा -** यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करणेबाबत आदेश देऊन सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
गव्हाणे सुरेखा शंकर
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/ ७७४/२०१६
दिनांक- २१/१०/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.